# उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# चौथा अहवाल

## (२०१७)

**(दिनांक   एप्रिल, २०१७ रोजी विधानसभा/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

२०१७

# उपविधान समिती

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

# चौथा अहवाल

# (२०१७)

एचबी ३२८९----१

## उपविधान समिती

**(सन २०१६-२०१७)**

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
(२) ॲड.रामचंद्र अवसरे, वि.स.स.
(३) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स.
(४) ॲड.संजय धोटे, वि.स.स.
(५) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.
(६) श्री.अमल महाडीक, वि.स.स.
(७) श्री.सुरेश भोळे, वि.स.स.
(८) श्री.तुकाराम काते, वि.स.स.
(९) श्री.अशोक पाटील, वि.स.स.
**** (१०) श्री.अमर काळे, वि.स.स.
(११) श्री. नितेश राणे, वि.स.स.
**** (१२) श्री.संग्राम जगताप, वि.स.स.
**** (१३) श्री.राहूल जगताप, वि.स.स.
(१४) श्री.सुभाष ऊर्फ पंडीतशेठ पाटील, वि.स.स.
* (१५) रिक्त
** (१६) रिक्त
(१७) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.
(१८) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.
*** (१९) रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी
(३) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव
(४) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

---

* श्री. विनायक मेटे, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ७ जुलै, २०१६ रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांचे समितीवरील पद रिक्त झाले आहे.

** श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांचे समितीवरील पद रिक्त झाले आहे.

*** श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांची विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजी संपुष्टात आल्यामुळे त्यांचे समितीवरील पद रिक्त झाले आहे.

**** सर्वश्री. अमर काळे, संग्राम जगताप व राहूल जगताप, वि.स.स. हे दिनांक २२ मार्च, २०१७ पासून ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत निलंबित.

एचबी ३२८९----१अ

**प्रस्तावना**

मी, उपविधान समितीचा समिती प्रमुख, समितीने तिच्या वतीने मला अहवाल सादर करण्यास अधिकार दिल्यानुसार समितीचा सन २०१६-२०१७ या वर्षातील कामकाजासंबंधीचा चौथा अहवाल सादर करीत आहे.

या अहवालात समितीने ४४ अंतिम अधिसूचना विचारात घेतल्या.

समितीने आदिवासी विकास विभागाच्या (अं.७८) अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी संबंधित विभागाच्या विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

तसेच समितीने दिनांक २९ ऑगस्ट, २०१६, ५ ऑक्टोबर, २०१६, २६ ऑक्टोबर,२०१६, ९ नोव्हेंबर,२०१६ तसेच ११ जानेवारी,२०१७ अशा एकूण ५ बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये समितीने ४४ अंतिम नियम प्रसिद्ध करणाऱ्या अधिसूचनांचे परिक्षण केले. समितीने दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत प्रारूप अहवालावर विचारविनिमय केला आणि किरकोळ सुधारणांसह तो संमत केला.

**विजयराव औटी,**
समिती प्रमुख,
उपविधान समिती.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ३० मार्च २०१७.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | | विषय (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| | | **ग्रामविकास व जलसंधारण विभाग** | |
| **(एक)** | **(१)** | **अधिसूचना क्रमांक १८ -** महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक जिपनि.२०१४/प्र.क्र.२३१(२)/पंरा-२, दिनांकित ९ एप्रिल २०१५. | १ |
| | | **उच्च व तंत्र शिक्षण विभाग** | |
| | **(२)** | **अधिसूचना क्रमांक ७१ -** महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ३ च्या पोट-कलम १ व २ अन्वये अधिसूचना क्र.संकीर्ण. २०१५/सीआर क्र.२५२/टीई-४, दिनांक १६ जून, २०१५ चे अधिक्रमण करून अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील अनुसूची क, ख व ग मध्ये पाठ्यक्रम प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम. २०१५/ सीआर ५३६/टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६. | २ |
| | **(३)** | **अधिसूचना क्रमांक ७२ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर तांत्रिक पाठ्यक्रमांना द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१५/ सीआर ५३६/टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६. | ३ |
| | **(४)** | **अधिसूचना क्रमांक ७७ -** महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (बी.एड., बी.पी. एड., एम.एड., एम. पी.एड.)द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बी.एड-४६१६/प्र.क्र.१/ मशि-२, दिनांकित ६ मे, २०१६. | ४ |
| | | **आदिवासी विकास विभाग** | |
| | **(५)** | **अधिसूचना क्रमांक ७८ -** महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एसटीसी-२०१६/ प्र. क्र. १०५/ का.१०, दिनांकित ३० जून, २०१६. | ५ |

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | **महसूल व वन विभाग** | |
| | **(६) अधिसूचना क्रमांक २ -** ' भूमिसंपादन,पुर्नवसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन. १२/ २०१३/प्र.क्र.१९०/ अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट,२०१४ ' | १७ |
| | **व** | |
| | **अधिसूचना क्रमांक ८४ -** 'भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन-१२/२०१३/ प्र.क्र.१९०/अ-२(भाग-१६), दिनांकित २१ एप्रिल, २०१६' | १७ |
| **(दोन)** | नियम तयार करण्यास तसेच विधानमंडळासमोर अधिसूचना ठेवण्यास आणि समितीच्या उपयोगासाठी कागदपत्रे पाठविण्यास झालेला विलंब याचे विवरण (परिशिष्ट-१). | २३ |
| **(तीन)** | उपविधान समितीने विचारात घेतलेले प्रारूप नियम (परिशिष्ट-२). | २९ |
| **(चार)** | उपविधान समितीने विचारात घेतलेले अंतिम नियम (परिशिष्ट-३). | ३१ |
| **(पाच)** | कार्यावलीचे परिशिष्ट (परिशिष्ट-४). | ३९ |
| **(सहा)** | बैठकीचे कार्यवृत्त | ५१ |
| **(सात)** | अनुपालन अहवाल–उपविधान समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील. | ५८ |

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

**अधिसूचना क्रमांक १८ - महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक जिपनि.२०१४/प्र.क्र.२३१(२) पंरा-२, दिनांकित ९ एप्रिल, २०१५.**

**उद्देश :—**

उपरोक्त नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मीमांसा करतांना विभागाने त्यांच्या स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे नमूद केले आहे की...

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतूदीनुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागास प्रवर्ग याकरिता राखीव असलेल्या सदस्यांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या व्यक्तीने नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये करण्यात आलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांमध्येही अशा प्रकारची तरतूद असणे आवश्यक होते. परंतु महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम १९६२ मधील १६ (२-ब) व १६(२-क) मध्ये " जातीचे मूळ प्रमाणपत्र " एवढाच उल्लेख करण्यात आलेला होता. त्यामुळे अधिनियमास अनुसरून या नियमांमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते.

ही बाब विचारात घेऊन सदर नियमांमध्ये सुधारणा करून " जातीचे मूळ प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र " असा बदल करण्यात आला आहे.

सदर अधिसूचना समितीच्या **दिनांक २९ ऑगस्ट, २०१६** रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सदर अधिसूचनेतील मराठी प्रतीतील नियम २ मध्ये सदर नियमांचे शीर्षक **" महाराष्ट्र पंचायत समिती (निर्वाचक गण व निवडणूक घेणे) नियम, १९६२ "** असे असून त्याचे भाषांतर इंग्रजी प्रतीमध्ये " Maharashtra Panchayat Samitis (Electoral College and conduct of Election) Rule, 1962 " याप्रमाणे करण्यात आले आहे. त्यामुळे " Electoral College " ऐवजी " Electoral division" अशी सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यामुळे उक्त इंग्रजी अधिसूचनेतील Rule 2 मधील वाक्याऐवजी " In rule 16 of the Maharashtra Panchayat Samitis (**Electoral Division** and conduct of Election) Rule, 1962 " असा बदल करण्याचे समितीने सुचविले आहे.

**अभिप्राय व शिफारस :-**

**सदर अधिसूचनेच्या इंग्रजी प्रतीमध्ये Rule no. 2 मध्ये In rule 16 of the Maharashtra Panchayat Samitis (Electoral College and conduct of Election) Rule, 1962 या वाक्यातील "Electoral College" या ऐवजी Electoral Division" अशी सुधारणा करण्यात यावी. तसेच याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्याच्या आत कळविण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**अधिसूचना क्रमांक ७१ - महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ३ च्या पोट-कलम १ व २ अन्वये अधिसूचना क्र.संकीर्ण. २०१५/सीआर क्र.२५२/टीई-४, दिनांक १६ जून,२०१५ चे अधिक्रमण करून अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील अनुसूची क, ख व ग मध्ये पाठ्यक्रम प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम. २०१५/ सीआर ५३६/टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६.**

उक्त अधिसूचनेद्वारे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील तंत्र शिक्षणाशी संबंधित विविध अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्था मधील पदवी व पदव्युत्तर, पदवी आणि पदविका पाठ्यक्रम आणि पाठ्यक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सदरहू नियम तयार करून अधिसूचित केले आहे.

सदर अधिसूचना उपविधान समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, सदर अधिसूचनेच्या मराठी प्रतीमध्ये अनुसूची " ग " च्या शीर्षकामध्ये " **व्यावसायिक तांत्रिक पदव्यूत्तर पदवी पाठ्यक्रम** " असे छापले आहे व इंग्रजी प्रतीमध्ये **Schedule-C** च्या **Heading** मध्ये 'Professional Education Diploma Course' तसेच अनुसूची " ख " च्या शीर्षकामध्ये " **व्यावसायिक पदवी पूर्व पाठ्यक्रम** " तर इंग्रजी प्रतीमध्ये " **Professional education under graduate course** " असे शब्द छापले आहेत.

उपरोक्त नियमाच्या अनुसूची " ग " व " ख " मधील इंग्रजी व मराठी प्रतीतील शीर्षकातील विसंगती लक्षात घेता समितीने अधिसूचनेच्या मराठी व इंग्रजी प्रतीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा सुचविल्या आहेत.

**(१) सदर अधिसूचनेच्या मराठी प्रतीमधील अनुसूची " ग " च्या शीर्षकामध्ये " व्यावसायिक तांत्रिक पदव्यूत्तर पदवी पाठ्यक्रम " असे छापले असून इंग्रजी प्रतीमध्ये Schedule-C च्या शिर्षकामध्ये 'Professional Education Diploma Course' असे शब्द छापले आहेत. तरी इंग्रजी प्रतीमध्ये 'Diploma' या शब्दाऐवजी 'Post Graduate' असा शब्द दाखल करण्यात यावा, अशी सुधारणा सुचविली आहे. सदर प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

**(२) सदर अधिसूचनेतील मराठी प्रतीतील अनुसूची 'ख' च्या शिर्षकामध्ये " व्यावसायिक तांत्रिक पदवीपूर्व पाठ्यक्रम" असे शब्द छापले आहेत. सदर अधिसूचनेच्या भाषांतरीत इंग्रजी प्रतीतील Schedule- B मध्ये "Professional Education Under graduate Courses " असे शब्द छापले आहेत. इंग्रजी प्रतीमधील शब्द बरोबर असून मराठी प्रतीतील " तांत्रिक " या शब्दाऐवजी " शिक्षण " असा** शब्द दाखल करण्यात यावा, अशी सुधारणा सुचविली आहे. सदर प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी, अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**अधिसूचना क्रमांक ७२ - महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ३ च्या पोट-कलम १ व २ अन्वये अधिसूचना क्र. संकीर्ण. २०१५/सीआर क्र.२५२/टीई- ४, दिनांक १६ जून , २०१५ चे अधिक्रमण करून अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील अनुसूची क, ख व ग मध्ये पाठ्यक्रम प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम. २०१५/ सीआर ५३६/टीई- ४, दिनांकित ११ मार्च, २०१६.**

सदर अधिसूचनेद्वारे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील तंत्र शिक्षणाशी संबंधित विविध अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्थामधील पदवी व पदव्युत्तर, पदवी आणि पदविका पाठ्यक्रम आणि पाठ्यक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सदरहू नियम तयार करून अधिसूचित केले आहेत.

सदर अधिसूचित नियम उपविधान समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आले असता समितीच्या असे निदर्शनास आले की, उपरोक्त अधिसूचनेच्या मराठी प्रतीमध्ये नियम क्रमांक २ (१) (क) मध्ये " **अधिनियमम** " असे छापले आहे. त्यामध्ये समितीने खालीलप्रमाणे सुधारणा सुचविली आहे.

**उपरोक्त अधिसूचनेतील नियम २ मधील (१) 'क' मध्ये "अधिनियमम" असा शब्द छापला आहे. त्याऐवजी "अधिनियम" अशी सुधारणा करण्यात यावी. सदर प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.**

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**अधिसूचना क्रमांक ७७ - महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था [व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (बी.एड., बी.पी. एड., एम.एड., एम. पी.एड.)द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन], नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक बी. एड.-४६१६/प्र.क्र.१/ मशि-२, दिनांकित ६ मे, २०१६.**

**उद्देश .—**

या अधिसूचनेद्वारे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारीतील तंत्र शिक्षणाशी संबंधित विविध अभ्यासक्रम राबविणाऱ्या शैक्षणिक संस्था मधील पदवी व पदव्युत्तर, पदवी आणि पदविका पाठ्यक्रम आणि पाठ्यक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सदरहू नियम तयार करुन अधिसूचित केले आहेत.

सदर अधिसूचना उप विधान समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, अधिसूचनेतील मराठी प्रतीमध्ये नियम २ (घ) मध्ये **" आवेदनपत्राचा नमुमा "** असे छापलेले आहे. त्यामध्ये समितीने खालीलप्रमाणे सुधारणा सुचविली आहे :—

**उपरोक्त उपरोक्त अधिसूचनेतील नियम २ मधील (घ) मध्ये " आवेदनपत्राचा नमुमा " असे शब्द छापले आहेत. त्याऐवजी " आवेदनपत्राचा नमुना " अशी सुधारणा करण्यात यावी. सदर प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात देण्यात यावी.**

## आदिवासी विकास विभाग

**अधिसूचना क्रमांक ७८ .- महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एसटीसी-२०१६/प्र.क्र.१०५/का.१०, दिनांकित ३० जून, २०१६.**

**सदरहू नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करतांना विभागाने समितीला स्पष्टीकरणात्मक टिप्पणीत असे कळविले होते की,...**

महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्ती यांना जातीचे प्रमाणपत्र देणे व अशा प्रमाणपत्राची पडताळणी करणे या बाबींचे विनियमन करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तद्अनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० " च्या कलम १८ नुसार शासनाने " महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ " दिनांक ४ जून, २००३ रोजी तयार केलेले आहेत.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांच्या पडताळणीचे कामकाज ऑनलाईन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सद्यःस्थितीत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या नमुना " ग " मधील वैधता प्रमाणपत्रावर समितीची मोहोर वगळता अन्य कोणत्याही महत्त्वाच्या निशाणींचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे निर्गमित करण्यात आलेल्या वैधता प्रमाणपत्राशी संबंधित अर्जदार याची शहानिशा करणे याबाबतची कोणतीही व्यवस्था उपलब्ध नसल्यामुळे अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या अनुसूचित जमातीच्या वैधता प्रमाणपत्रावर संबंधित अर्जदाराचा रंगीत पासपोर्ट साईज (आकाराचा) फोटो तसेच वैधता प्रमाणपत्रास संबंधित समितीचा विशिष्ट गुप्त संकेतांक असलेला बारकोड नमूद करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. तसेच संबंधित यंत्रणांना थेट ऑनलाईन प्रणालीव्दारे उमेदवार व त्याच्या वैधता प्रमाणपत्राची सत्यासत्यता पडताळता येणार आहे.

त्यानुषंगाने " महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३ " मधील अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्राचा नमुना " ग " मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने, अंतिम नियम " महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ " म्हणून दिनांक १ जुलै,२०१६ रोजी प्रसिद्ध केले आहेत.

दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या बैठकीत सदर अधिसूचना समितीच्या विचारार्थ ठेवली असता सदर अधिसूचनेद्वारे शासनाकडून महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम,२०१३ यामध्ये अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र देताना बारकोड क्रमांक व पासपोर्ट

आकाराचे अर्जदाराचे रंगीत छायाचित्र प्रमाणपत्रावर असावे अशी सुधारणा करण्यात आली आहे. यामध्ये प्रमाणपत्राचे डुप्लीकेशन होऊ नये असा यामागे शासनाचा उद्देश आहे. यावर समितीने असे मत मांडले की, सदर अधिसूचनेत करण्यात आलेल्या सुधारणेनुसार काही भागात देण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रावर बारकोड नमूद केलेला नाही व त्यामुळे याप्रकरणी अधिक खुलासा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी, असा निर्णय सदर बैठकीत घेण्यात आला. तसेच सदर साक्षीच्या अनुषंगाने उपरोक्त अधिसूचने संदर्भातील प्रश्नावली दिनांक २६ ऑक्टोबर,२०१६ रोजी आदिवासी विकास विभागास पाठविण्यात आली. आदिवासी विकास विभागाकडून सदर प्रश्नावलीसंदर्भात प्राप्त झालेली माहिती **परिशिष्ट " अ " मध्ये सादर करण्यात आली आहे.**

**विभागीय प्रतिनिधींची साक्ष .—**

सदर अधिसूचना तसेच विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी उपविधान समितीकडून आदिवासी विकास विभागाच्या विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्या वेळी विभागाचे प्रधान सचिव उपस्थित नसल्याने सदर साक्षीच्या बैठकीस उपस्थित असलेल्या आदिवासी विकास विभागाच्या उप सचिवांनी समितीस माहिती दिली.

सदर साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जात वैधता प्रमाणपत्रावर अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र आणि बारकोड क्रमांक नमूद करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी कधीपासून व कोणत्या जिल्ह्यात करण्यात आली. तसेच त्या अनुषंगाने विभागाने ४९७५ लोकांना जात वैधता प्रमाणपत्रे दिली आहेत तरी या प्रक्रियेत काही तांत्रिक अडचणी येत आहे काय किंवा जात वैधता प्रमाणपत्र उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत तसेच यासंदर्भात विभागाने नियोजित वेळेचा कार्यक्रम तयार केला आहे काय? त्यानुषंगाने विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, भारतात प्रथमच अनुसूचित जमाती जात पडताळणी ऑनलाईन पद्धतीने सुरू झाली, यापूर्वी जात पाडताळणी समितीच्या ठिकाणी प्रत्यक्षात जाऊन फॉर्म भरणे, कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आदिवासी विद्यार्थी किंवा तरुणांना अनेकदा जावे लागत होते. सदर त्रास कमी करण्यासाठी तसेच सदर कामामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाईन पद्धत सुरू करण्यात आली. सदर प्रणाली सुरू करण्यासाठी त्यावर ८ ते ९ महिने काम करण्यात आले. दिनांक १ मे, २०१६ रोजी मा. राज्यपाल यांच्या हस्ते सदर प्रणाली सुरू केली. सदर प्रणालीत काम करताना अद्यापही काही अडचणी येत आहेत. प्रणाली सुरू झाल्यानंतर मिळालेला यशाचा दर (Success rate) चांगला आहे. ऑनलाईन अर्ज केल्यानंतर तो ज्या न्यायाधिकार क्षेत्रामध्ये (jurisdiction) आहे, तेथील समितीकडे जातो. समितीमधील संशोधन अधिकारी त्या अर्जाची प्राथमिक छाननी करतो व सदर अर्ज योग्य पद्धतीने भरला आहे किंवा नाही तसेच त्यासोबत जोडलेली कागदपत्रे प्रमाणित करून नंतर ऑनलाईन पद्धतीने वरिष्ठ संशोधन अधिकाऱ्याकडे पाठविला जातो. एखाद्या अर्जदाराने अर्जासोबत अपूर्ण कागदपत्रे जोडली असल्यास तो अर्ज पुन्हा अर्जदाराला पाठविला जातो. त्याबाबत संबंधित अर्जदाराच्या मोबाईलवर एसएमएस केला जातो व ई-मेल सुद्धा पाठविला जातो. त्यानंतर त्यांच्याकडून माहिती सादर केल्यानंतर तो अर्ज पुन्हा अधिकाऱ्यांकडे पाठविला जातो.

अर्जदाराने केलेल्या अर्जात त्रुटी आढळून आल्यानंतर त्याबाबत त्याला एसएमएस व मेल केल्यानंतर त्याची ज्येष्ठता किंवा त्याला मिळालेला नंबर मागे जातो काय? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, ऑनलाईन अर्ज केल्यानंतर अर्जदाराला तिकिट मिळालेले असते, त्यावर तो पुन्हा अर्ज सादर करू शकतो, विद्यार्थ्यांना जात वैधता समितीकडे वारंवार जाण्याची गरज नाही. त्याकरिता त्यांना ठराविक तारीख दिली जाते. त्या तारखेला त्यांनी सर्व मूळ कागदपत्रे आणायची, त्यावेळी त्याचे बायोमेट्रिक घेतले जाते. तसेच त्यांचा फोटोसुद्धा वेब कॅमेराद्वारे घेतला जातो. सर्व जात वैधता पडताळणी समित्यांच्या ठिकाणी एक स्वागत कक्ष उभारण्यात आला आहे. तेथे संबंधित अर्जदार आल्यानंतर त्यांची कागदपत्रे तपासून त्यानंतर सह आयुक्त, उप संचालक, वरिष्ठ संशोधन अधिकारी यांच्याकडून त्यासंबंधीचा निर्णय घेतला जातो. सदर निर्णय सुद्धा ऑनलाईन असतो. या संदर्भात रोजनामा लिहिला जातो व तो प्रत्येक समिती सदस्यांकडे गेल्यानंतर ते सदर जात प्रमाणपत्र वैध आहे किंवा अवैध आहे यासंबंधी निर्णय घेतात.

ऑनलाईन पद्धत असल्यामुळे समिती सदस्यांनी दिलेल्या मताचे संकलन कशा पद्धतीने केले जाते, तसेच समितीच्या कामाचा यशाचा दर किती आहे?अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, विभागाकडे ई-फाईलिंगची व्यवस्था असल्यामुळे समिती सदस्यांनी दिलेल्या मतांचे संकलन ऑनलाईन पद्धतीने केले जाते. जिल्हा स्तरावर एकूण ८ जात पडताळणी समित्या आहेत. त्यांच्याकडे दिनांक १ मे, २०१६ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत १७,१९६ ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी अपूर्ण माहिती, चुकीच्या पद्धतीने अर्ज भरणे अशा कारणांमुळे ४,२४३ अर्ज रद्द झाले. तसेच, ४,९७५ उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्रे दिली आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, विभागाची जात प्रमाणपत्र वैधता तपासणी समितीची पद्धती चांगली आहे, त्याबद्दल कोणाचाही आक्षेप नाही. परंतु, यशाच्या दरासंबंधी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यात ४९७५ पैकी किती उमेदवारांना वैध जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली, याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती नंतर समितीला उपलब्ध करून दिली जाईल. दिनांक ६ सप्टेंबर १९५० रोजीच्या आदेशानुसार आदिवासींच्या संदर्भात जे निकष आहेत. तसेच, जे कागदपत्र विहित केले आहे त्यानुसार कागदपत्र नसल्यास अर्ज रद्द केले जातात. दिनांक १ मे २०१६ पासून सर्व प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. तसेच त्यापूर्वी केलेले अर्जसुद्धा ऑनलाईन प्रणालीवर हस्तांतरित करण्यात येत आहेत.

आदिवासी विद्यार्थी किंवा उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यास अडचणी येत असल्यासंबंधी काही तक्रारी आल्या आहेत काय, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, ऑनलाईन पद्धतीने अर्ज करताना काही तक्रारी आल्या नाहीत. तसेच, अर्ज करण्यासाठी कोणताही चार्ज आकारला जात नाही. आदिवासी विकास विभागाकडून महाऑनलाईन या कंपनीकडे एका जात पडताळणी प्रमाणपत्राच्या अर्जासाठी रुपये १७ भरले जातात. संबंधित विद्यार्थी इंटरनेट कॅफे, सेतू किंवा संग्राममध्ये जाऊन

ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात. नंदुरबार येथील विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन सिस्टिमसंबंधी चौकशी केली असता ते समाधानी आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, उप विभागीय अधिकाऱ्यांकडून अदा केलेले जात प्रमाणपत्र बोगस असल्यास जात पडताळणी समितीकडून वैध जात प्रमाणपत्र दिले जात नाही. यामुळे बोगस जात प्रमाणपत्र येण्याची शक्यता कमी होईल. जात पडताळणी प्रमाणपत्र देण्याच्या टक्केवारीची माहिती समितीला समजली पाहिजे. जात प्रमाणपत्र बोगस असो किंवा अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे पडताळणी समितीसमोर न आल्यास समितीकडून जात प्रमाणपत्र रद्द करण्याची प्रक्रिया केली जात नाही. अशाप्रकारे संबंधितांविरुद्ध कारवाई केल्याची काही उदाहरणे आहेत काय याप्रकरणी विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, जात पडताळणी समितीने ज्यांच्याकडून सदर जात प्रमाणपत्र निर्गमित झाले आहे, त्यांना पडताळणी समितीकडून जात प्रमाणपत्र अवैध झाले असून कायद्यामधील कलम १०, ११ व १२ नुसार कारवाई करण्यासंबंधी अवगत केले जाते. सदर जात प्रमाणपत्र अवैध झाल्यानंतर संबंधितांनी नियोक्त्यांनी कायद्यानुसार सदर कर्मचाऱ्यांवर कारवाई करायची असते. तसेच, समितीने जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यापूर्वी अर्जदाराला सुनावणीकरिता बोलाविले जाते काय अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, उमेदवारांना सुनावणीकरिता बोलाविले जाते. त्याचे सर्व दस्ताऐवज तपासून त्यानंतर पडताळणी प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने निर्गमित केले जाते.

उपरोक्त अधिसूचनेच्या अनुषंगाने दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत आश्वासित केलेली माहिती विभागाने उप विधान समितीकडे पाठविली असून सदर माहिती समितीच्या दिनांक ११ जानेवारी , २०१७ रोजीच्या बैठकीत ठेवण्यात आली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ या अधिसूचनेस मंजुरी देत असताना समितीने जिल्हास्तरावरील ८ समित्यांनी वैध व अवैध प्रमाणपत्रांची माहिती विभागाकडून मागविली होती. विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सदरहू ८ जिल्हास्तरीय समित्यांनी एकूण ४,९७५ प्रमाणपत्रे निर्गमित केले असून अवैध प्रमाणपत्रांची संख्या निरंक आहे, **(माहिती परिशिष्ट " ब " मध्ये सादर करण्यात आली आहे.)**

**सदर अधिसूचनेवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

अं०७५ पीमाहिती

# परिशिष्ट "अ"

आदिवासी विकास विभाग

महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्र.एसटीसी-२०१६/प्र.क्र.१०५/का.१० दिनांकित ३०जुन, २०१६ संदर्भात उपविधान समिती समोर दिनांक ९/११/२०१६ रोजी असलेली साक्षीबाबतची प्रश्नावलीची मुद्देनिहाय माहीती

---

मुद्या क्र. १) राज्यातील किती जिल्ह्यात अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत?

स्पष्टीकरण :-महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत अनुसूचित जमातीची जात प्रमाणपत्रे पडताळणीसाठी आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या पुणे, ठाणे, नाशिक, नंदूरबार, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, गडचिरोली येथे वेळोवेळी विविध शासन निर्णयानुसार गठीत करण्यात आलेल्या आहेत.

अ) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. सीबीसी-१६८४/२८१(२५)का.११, दिनांक २३ जानेवारी, १९८५ अन्वये राज्यस्तरावर अनुसूचित प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे, गठित करण्यात आली असुन पुणे समितीचे कार्यक्षेत्र पुणे, सातारा, सांगली, सोलापुर व कोल्हापुर आहे.

ब) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. एसटीसी-१०९०/२३९७२/१८६/का.१० दिनांक ३ जुन. १९९२ अन्वये नाशिक व नागपूर येथे अनुसुचित प्रमाणपत्र तपासणी समित्या गठित करण्यात आल्या असुन नाशिक समितीचे कार्यक्षेत्र नाशिक व अहमदनगर आहे. तसेच नागपूर समितीचे कार्यक्षेत्र वर्धा, नागपूर, भंडारा व गोंदिया आहे.

क) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.एसटीसी-१०९९/प्र.क्र.१३८/का.१० दिनांक ६ सप्टेंबर, २००० अन्वये ठाणे, औरंगाबाद व अमरावती येथे अनुसूचित प्रमाणपत्र तपासणी समित्या गठित करण्यात आल्या असुन ठाणे समितीचे कार्यक्षेत्र मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग आहे. औरंगाबाद समितीचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर व हिंगोली आहे. अमरावती समितीचे कार्यक्षेत्र बुलढाणा, वाशीम, अकोला, अमरावती व यवतमाळ आहे.

ड) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. एसटीसी-१००६/प्र.क्र.९८६/का.१० दिनांक ८/१२/२००६ अन्वये गडचिरोली व नंदूरबार येथे अनुसूचित प्रमाणपत्र तपासणी समित्या गठित करण्यात आल्या. गडचिरोली समितीचे कार्यक्षेत्र गडचिरोली व चंद्रपुर आहे. तसेच नंदूरबार समितीचे कार्यक्षेत्र नंदूरबार, धुळे व जळगाव आहे.

मुद्दा क्र. २) सदर समित्यांमार्फत जात वैधता प्रमाणपत्र देण्यासंबंधीची कार्यपध्दती काय आहे?

स्पष्टीकरण :- समित्यांमार्फत जात वैधता प्रमाणपत्र देण्यासंबंधी कार्यपध्दती –

शासनाने "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २०००, (२००१ चा महाराष्ट्र क्र.२३)" लागू केला असून त्याअंतर्गत "महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३" तयार केलेले आहेत. या नियमांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने कुमारी माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या निर्णयातील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीची विहित पध्दत अंतर्भुत केलेली आहे. त्यानुसार अधिनियम २००० व नियम २००३ मधील तरतुदीनुसार अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या जमातीच्या प्रमाणपत्रांची तपासणी करतात.

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते. शैक्षणिक, सेवा, निवडणूक इत्यादी विविध कारणास्तव अर्जदार अथवा नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून अनुसूचित जमातीच्या अर्जदारांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे अर्ज करण्यात येतो. तपासणी समित्यांकडून यापूर्वी ऑनलाईन प्रणालीद्वारे केवळ अर्ज स्विकारण्यात येऊन त्यापुढील कार्यवाही ही मॅन्युअल पध्दतीने करण्यात येत होती. त्यामुळे समित्यांकडून अर्जावर होणारी कार्यवाही ही ऑनलाईन व्हावी तसेच कार्यवाहीच्या प्रत्येक टप्प्याची माहिती अर्जदारास ऑनलाईन प्राप्त व्हावी यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेद्वारे अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी नवीन ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. शासनाने दिनांक ३०.४.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या दाव्याची पडताळणी करण्यासाठी दिनांक १ मे, २०१६ पासून आदि 'प्रमाण' प्रणाली (etribevalidity) सुरु केलेली आहे.

त्यानुसार अनुसूचित जमातीच्या दाव्याची पडताळणीची खालील नमुद केलेली सर्व प्रक्रिया अर्जदारास त्याच्या प्रकरणाची सद्यस्थिती etribevalidity (आदिप्रमाण प्रणाली) मुळे eamail/sms/ तसेच login द्वारे मिळण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे:-

१) अर्जदार etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर Registration करुन Online अर्ज समितीकडे सादर करतात.
२) समितीकडे Online प्रकरणे प्राप्त झाल्यानंतर उपसंचालक (स) यांचेमार्फत प्रकरण संशोधन अधिकारी/ वरिष्ठ संशोधन अधिकारी यांच्याकडे Online पडताळणीसाठी पाठवितात.
३) संशोधन अधिकारी/ वरिष्ठ संशोधन अधिकारी प्रकरणाची तपासणी करुन उमेदवारास दूरध्वनीद्वारे प्रत्यक्ष प्रकरण (Physical Scrutiny) करण्यासाठी कळवितात.
४) अर्जदार समिती कार्यालयात आल्यानंतर त्यास टोकन देऊन संबंधित अधिका-याकडे त्याच्या प्रकरणाची तपासणी करण्याकरीता पाठविण्यात येते.
५) संबंधित अधिका-याद्वारे प्रकरणाची पडताळणी झाल्यानंतर Biometric यंत्रणेद्वारे अर्जदा-याच्या प्रकरणाची नोंद घेऊन Web Camera द्वारे त्याचा फोटो घेण्यात येतो व त्यास त्याची पोहोच देण्यात येते.
६) प्रकरण समितीपुढे निर्णयासाठी येते. प्रकरणाची गुणवत्ता तपासून समितीचे सदस्य आपले मत Online नोंदवितात. उपलब्ध कागदपत्रे समाधानकारक असल्यास समिती सदस्य एकमताने वैधता प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेऊन रोजनामा/ आदेश तयार करतात.

७) रोजनामा/आदेश झाल्यानंतर अर्जदाराचा फ़ोटो व बारकोड असलेले, ऑनलाईन सिस्टीमद्वारे तयार करण्यात आलेले वैधताप्रमाणपत्र उपसंचालकांची सही झालेनंतर मुद्रांकित करुन सर्टिफ़िकेट लॅमिनेशन करुन नोंदणीपोच डाकने पाठविण्यात येते.

८) तपासणी समितीस एखाद्या प्रकरणी अर्जदाराच्या दाव्याबद्दल समाधान न झाल्यास अशा प्रकरणी पोलीस दक्षता पथकाकडे शालेय व गृह चौकशीसाठी सोपविण्यात येते. दक्षता पथकातील पोलीस निरीक्षक प्रकरणाची शालेय व गृह चौकशीकरुन आपला अहवाल दक्षता पथकाचे प्रमुख पोलीस उपअधिक्षक यांचेकडे सादर करतात. प्राप्त अहवालावर दक्षता पथकास संलग्न असलेल्या संशोधन अधिका-यांच्या अभिप्रायासह पोलीस उपअधिक्षक असा चौकशी अहवाल आपल्या अभिप्रायासह समितीस सादर करतात.

९) पोलीस दक्षता पथकाचा अहवाल अर्जदाराच्या दाव्याशी प्रतिकुल असल्यास असा अहवाल संबंधित अर्जदारास पाठवून त्या बाबत त्याचे स्पष्टिकरण १५ दिवसांत सादर करण्याविषयी त्यास समितीमार्फ़त नोटीस बजावण्यात येते.

१०) अर्जदाराचे चौकशी अहवालावर स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतर त्यास समिती समोर प्रत्यक्ष सुनावणीची संधी देण्यात येते. अर्जदारास सदर मुलाखतीचे वेळी त्याचे चौकशी अहवालावर म्हणणे तसेच त्याने दावा केलेल्या जमातीविषयीची माहीती व विचारणा केली जाते. अर्जदाराने सादर केलेली कागदपत्रे तसेच त्याने दावा केलेल्या जमाती विषयी दिलेल्या माहीती आधारे समिती प्रकरण तपासून अंतिम निर्णय घेत असते. अर्जदाराने दिलेली माहिती समाधानकारक आढळून आल्यास त्यास समितीकडून वैधता प्रमाणपत्रे निर्गमित केले जाते. अर्जदाराने दिलेली माहीती त्याच्या जमाती विषयी चुकीची अथवा विसंगत आढळून आल्यास समिती असे प्रकरण अवैध ठरविते व समितीचा निर्णय अर्जदारास कळविण्यात येतो.

मुद्दा क्र. ३) सदर जात वैधता प्रमाणपत्रावर अर्जदारांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र तसेच बारकोड क्रमांक नमुद करण्याच्या शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी कधीपासून व कोणत्या जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहे?

<u>स्पष्टीकरण</u> :- शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-२०१६/प्र.क्र.८५/का.१० दिनांक ३० एप्रिल, २०१६ अन्वये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज Online करण्यासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणीकीकृत Online प्रणालीची अंमलबजावणी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून दिनांक १ मे, २०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे. राज्यातील सर्व आठही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडून शासनाचे अधिसुचनेप्रमाणे अर्जदारांचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र तसेच बारकोड क्रमांक समाविष्ठ असलेल्या सुधारीत वैधता प्रमाणपत्राचे नमुन्यामध्ये प्रमाणपत्रे निर्गमित करण्यास सुरवात करण्यात आलेली आहे.

मुद्या क्र. ४) असल्यास, आतापर्यंत बारकोड व छायाचित्र असलेले किती जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले आहेत?

स्पष्टीकरण :-शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-२०१६/प्र.क्र.८५/का.१० दिनांक ३० एप्रिल, २०१६ अन्वये अनुसूचित जमाती प्रमापत्र तपासणी समित्यांचे कामकाज Online करण्यासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणीकीकृत Online प्रणालीची अंमलबजावणी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून दिनांक १ मे, २०१६ पासून सुरु करण्यात आलेली आहे. या प्रणालीद्वारे दिनांक १ मे, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ या कालावधीत खालील प्रमाणे समितीनिहाय अर्जदाराचे छायाचित्र व बारकोड समाविष्ठ असलेली वैधताप्रमाणपत्रे निर्गमित केलेली आहेत.

| अ.क्र. | समितीचे नाव | सुधारीत वैधता प्रमाणपत्राप्रमाणे दिनांक १ मे, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ अखेर निर्गमित करण्यात आलेल्या वैधता प्रमाणपत्रांची संख्या |
|---|---|---|
| १ | पुणे | ४०४ |
| २ | ठाणे | ११४२ |
| ३ | नाशिक | ९१५ |
| ४ | नंदुरबार | १००३ |
| ५ | औरंगाबाद | ४८९ |
| ६ | अमरावती | ५८१ |
| ७ | नागपूर | १८८ |
| ८ | गडचिरोली | २५३ |
| | एकूण | ४९७५ |

मुद्या क्र. ५) बारकोड व अर्जदाराचे छायाचित्र असलेले जात वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवली आहेत काय?

स्पष्टीकरण :- शासन अधिसूचना, आदिवासी विकास विभाग क्रमांक एसटीसी-२०१६/प्र.क्र.१०५/का.१० दिनांक ३० जुन, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आलेले सुधारीत वैधता प्रमाणपत्र न्यायालयात आव्हानीत करण्यात आलेले नाही.

मुद्या क्र. ६) काही जिल्ह्यांमध्ये अद्यापी बारकोड व छायाचित्र असलेले जात वैधता प्रमाणपत्रे देण्यात येत नाही तिथे त्याची कारणे काय आहेत? असल्यास त्याचे निवारण करण्यात कसे आले आहे काय?

स्पष्टीकरण :- राज्यातील सर्व आठही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडून सुधारीत नमुन्यात वैधताप्रमाणपत्रे निर्गमित करण्यात येत आहेत.

अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी नवीन संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्याबाबत-

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसटीसी-२०१६/प्र.क्र.८५/का.१०
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: ३० एप्रिल, २०१६.

वाचा-

१) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० (२००१ चा महा.क्र.२३).

२) महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम, २००३.

३) शासन पत्र क्रमांक एसटीसी-२०१४/प्र.क्र.१२६ (भाग-६)/का.१०, दिनांक १६.११.२०१५.

४) शासन पत्र क्र.एसटीसी-१०१०/प्र.क्र.६९/का.१०, दिनांक १०.१२.२०१५.

प्रस्तावना-

आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून संदर्भाधीन अधिनियम २००० व नियम २००३ च्या अनुषंगाने अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते. शैक्षणिक, सेवा, निवडणूक इत्यादी विविध कारणास्तव अर्जदार अथवा नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून अनुसूचित जमातीच्या अर्जदारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याकरिता संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडे अर्ज करण्यात येतो. तपासणी समित्यांकडून सद्य:स्थितीत ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्ज स्विकारण्यात येतात. तर तपासणी समित्यांकडून त्यापुढील कार्यवाही ही मॅन्युअल पध्दतीने करण्यात येते. नागरीकांना विविध सेवा या ऑनलाईन मिळाव्यात हे राज्य शासनाचे धोरण आहे. त्यामुळे अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या तपासणीची कार्यवाही ही ऑनलाईन व्हावी तसेच अर्जदारास विविध टप्प्याची माहिती ऑनलाईन उपलब्ध व्हावी यासाठी अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या तपासणीसाठी नवीन संगणकीकृत ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. सदर ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समितीकडून सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

१. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज ऑनलाईन करण्यासाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या संगणकीकृत ऑनलाईन प्रणालीची अंमलबजावणी सर्व अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून दिनांक १ मे, २०१६ पासून सुरु करण्यात येत आहे.

२. सदर ऑनलाईन संगणकीकृत प्रणालीचे नामकरण आदि 'प्रमाण' प्रणाली असे करण्यात येत आहे.

३. सदर प्रणाली दिनांक १ मे, २०१६ पासून अंमलात आणण्यात येणार असल्याने त्या दिनांकापासून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठीचे सर्व अर्ज आदि 'प्रमाण' प्रणाली या ऑनलाईन प्रणालीद्वारे स्विकारुन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणीसाठीचे अर्ज हे etribevalidity.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर दाखल करुन नियमानुसार आवश्यक कागदपत्रे अपलोड करावेत. सदर संकेतस्थळावर अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अर्जाची सद्य:स्थिती, सुनावणीचा दिनांक इत्यादी बाबत सविस्तर माहिती अर्जदारास उपलब्ध करुन घेता येईल.

५. सदर ऑनलाईन संगणकीकृत आदि 'प्रमाण' प्रणाली द्वारे दिनांक १ मे, २०१६ नंतर तपासणी समितीकडे प्राप्त होणाऱ्या प्रकरणांमध्ये निर्गमित होणाऱ्या वैधता प्रमाणपत्राची शहानिशा संबंधितांना करता येईल.

६. दिनांक १ मे, २०१६ नंतर प्रमाणपत्र पडताळणीसाठीचा अर्ज अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडून मॅन्युअल पध्दतीने स्विकारण्यात येणार नाहीत.

७. आदि 'प्रमाण' प्रणालीच्या वापरासंदर्भात अर्जदार व तपासणी समितीसाठी मार्गदर्शनपर मॅन्युअल तयार करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४३०१५५६१८९७२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Laxmikant G Dhoke

(ल.गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
८. मा.अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मा.अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
१२. सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली,
१३. सचिव, कार्मिक, लोकशिकायत तथा पेंशन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

१४.सचिव, जनजातीय कार्य मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
१५.मुख्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६.कुल सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई/ पुणे विद्यापीठ, पुणे/ नागपूर विद्यापीठ, नागपूर/ अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद/ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, श्रीमती नाथीबाई दामोदरदास ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई/ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
१७.आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१८. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
१९.सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, ठाणे/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/नागपूर/गडचिरोली/नंदुरबार/अमरावती
२०.सर्व विभागीय आयुक्त,
२१.सर्व जिल्हाधिकारी,
२२.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३.सर्व उपजिल्हाधिकारी,
२४.सर्व उपविभागीय अधिकारी (महसूल)
२५.सर्व तहसिलदार,
२६.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
२७.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, महाराष्ट्र राज्य
२८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी/शिक्षण निरीक्षक
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
३२.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
३३.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
३४.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
३५.सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात.

३६.सह/उप सचिव/अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३७.सर्व कार्यासन अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -४०००३२.
३८. निवड नस्ती/का.१०.

---------

## परिशिष्ठ ‘ ब ’

समितीनिहाय वैध व अवैध प्रमाणपत्रांची माहिती (माहे सप्टेंबर,२०१६ अखेर)

| अ.क्र. | समितीचे नांव | एकूण निर्गमित प्रमाणपत्रांची संख्या | निर्गमित केलेले प्रमाणपत्र | |
|---|---|---|---|---|
| | | | वैध प्रमाणपत्र संख्या | अवैध प्रमाणपत्र संख्या |
| १. | पुणे | ४०४ | ४०४ | - |
| २. | नाशिक | ९१५ | ९१५ | - |
| ३. | नागपूर | १८८ | १८८ | - |
| ४. | ठाणे | ११४२ | ११४२ | - |
| ५. | औरंगाबाद | ४८९ | ४८९ | - |
| ६. | अमरावती | ५८१ | ५८१ | - |
| ७. | नंदूरबार | १००३ | १००३ | - |
| ८. | गडचिरोली | २५३ | २५३ | - |
| | एकूण | ४९७५ | ४९७५ | |

## महसूल व वन विभाग

**अधिसूचना क्रमांक २.—** ' भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन. १२/२०१३/प्र. क्र. १९०/अ-२, दिनांकित २७ ऑगस्ट २०१४ '.

व

**अधिसूचना क्रमांक ८४.—**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिद्ध करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन-१२/२०१३/प्र.क्र. १९०/अ-२ (भाग-१६), दिनांकित २१ एप्रिल २०१६.

**उद्देश :**

उपरोक्त अधिसूचना क्रमांक ८४ च्या संदर्भात नियम करण्यामागील उद्देश व कारणे यांची मिमांसा करतांना विभागाने असे स्पष्टीकरण दिले आहे की....

केंद्र शासनाचा "The Right to fair compensation and Transparency in land Aguisition, Rehabilitation and Resettlement Act, 2013" हा नवीन कायदा दिनांक १ जानेवारी २०१४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर कायद्यातील कलम १०९ अन्वये राज्य शासनास संबंधित कलमाच्या अनुषंगाने नियम करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्य शासनाची आवश्यक ती मंजूरी घेऊन महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक १९६, दिनांक २७ ऑगस्ट २०१४ रोजी शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आलेली असून त्यानुसार भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येत आहे. उक्त नियमातील नियम क्रमांक ७ अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मूल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त करण्यात आली होती :—

(क) राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन अशासकीय समाजशास्त्रज्ञ,

(ख) ज्यांना सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रियेमध्ये प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल अशा ग्रामसभेच्या, पंचायतीच्या, नगरपरिषदेच्या अथवा महानगरपालिकेच्या सदस्यांमधून दोन प्रतिनिधी, यापैकी किमान एक महिला प्रतिनिधी असेल,

(ग) ज्यांना पुनर्वसनाबाबतचे आकलन असेल आणि/किंवा ज्यांनी राज्याच्या पुनर्वसन धोरण निर्मितीमध्ये भरीव सहभाग दिलेला असेल अशा दोन व्यक्ती,

(घ) वन विभागाचे सचिव आणि ज्याच्या अधिकारितेमध्ये प्रकल्प येत असेल त्या विभागाचे सचिव,

(ङ) प्रकल्पाशी संबंधीत क्षेत्रामधील अथवा त्या विषयामधील, कार्यकारी अभियंता पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा तंत्रविषयक तज्ञ,

(२) वन (भूसंपादन) विभागाचा सचिव हा, तज्ञ गटाच्या सदस्यांमधून अध्यक्ष असेल.

(क) सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ च्या कलम २१ च्या उप-कलम (एक) (i) नुसार अधिसूचना क्रमांक एनएसई. २०१५/ प्र. क्र. १५४/ उद्योग-७, दिनांक २० जानेवारी, २०१६ मध्ये केलेली सुधारणा प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमएसई.२०१५/प्र.क्र.१५४/उद्योग-७, दिनांकित १८ मे, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

२९. **अधिसूचना क्रमांक ७१ -** महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ३ च्या पोट-कलम १ व २ अन्वये अधिसूचना क्र.संकीर्ण. २०१५/सीआर क्र.२५२/टीई-४, दिनांक १६ जून,२०१५ अधिक्रमण करुन अनुसूचीच्या स्तंभ (३) मधील अनुसूची क,ख, ग मध्ये पाठयक्रम प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम.२०१५/सीआर ५३६/टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालील सुधारणा सुचविल्या आहेत.**

**१. सदर अधिसूचनेच्या मराठी प्रतीमधील अनुसूची " ग " च्या शिर्षकामध्ये व्यावसायिक तांत्रिक पदव्युत्तर पदवी पाठ्यक्रम असे छापले असून इंग्रजी प्रतीमध्ये Schedule-C च्या शिर्षकामध्ये ' Professional education Diploma Courses 'असे शब्द छापले आहेत. तरी इंग्रजी प्रतीमध्ये 'Diploma ' या शब्दाऐवजी ' Post Graduate ' असा शब्द दाखल करण्यात यावा, अशी सुधारणा सुचविली आहे.**

**२. सदर अधिसूचनेतील मराठी प्रतीतील अनुसूची ' ख ' च्या शिर्षकामध्ये " व्यावसायिक तांत्रिक पदवीपूर्व पाठ्यक्रम " असे शब्द छापले आहेत. सदर अधिसूचनेच्या भाषांतरीत इंग्रजी प्रतीतील "Schedule-B " मध्ये " Professional Education Undergraduate Courses " असे शब्द छापले आहेत. इंग्रजी प्रतीमधील शब्द बरोबर असून मराठी प्रतीमध्ये " तांत्रिक " या शब्दाऐवजी " शिक्षण " असा शब्द दाखल करण्यात यावा, अशी सुधारणा सुचविली आहे.**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

३०.**अधिसूचना क्रमांक ७२ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक पदव्युत्तर तांत्रिक पाठ्यक्रमांना द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम-२०१५/ सीआर ५३६/टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालील सुधारणा सुचविली आहे.**

**उपरोक्त अधिसूचनेतील नियम २ मधील (१) 'क' मध्ये "अधिनियमम" असा शब्द छापला आहे. त्याऐवजी "अधिनियम" अशी सुधारणा सुचविली आहे.**

३१.**अधिसूचना क्रमांक ७३ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यवसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवीपूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम.२०१५/सीआर ५३६/ टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

३२.**अधिसूचना क्रमांक ७४ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यवसायिक शैक्षणिक संस्था (पूर्ण वेळ व्यावसायिक तांत्रिक पदविका पाठ्यक्रमांच्या प्रवेशाचे विनियमन) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक टीईएम.२०१५/सीआर ५३६/ टीई-४, दिनांकित ११ मार्च, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

३३.**अधिसूचना क्रमांक ७५ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम २ च्या खंड (द) व कलम ३ च्या पोट-कलम (१) व (२) अन्वये अधिसूचना क्रमांक एमआयएससी-२०१५/प्र.क्र.२५२/ तांशि-४, दिनांक १६ जून,२०१५ अनुसार अनुसूचीच्या स्तंभ (२) व (३) मध्ये व्यावसायिक शैक्षणिक अभ्यासक्रम तसेच त्यासाठीच्या प्रवेशासाठी व पात्रतेसाठीच्या अटी व शर्ती प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक बीएड ४६१५/ प्र.क्र.२१०/मशि-२, दिनांकित २१ जानेवारी, २०१६ तसेच महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (पुढील अडचणी दूर करणे) आदेश, २०१६ या विषयावरील आदेश क्रमांक शुल्क-२०१२/ प्र.क्र. १८३/ १२/मशि-२, दिनांकित २१ जानेवारी, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

३४.**अधिसूचना क्रमांक ७६ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक विधी पदवी पाठ्यक्रमांना द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक सीईटी.२०१६/प्र.क्र.२४३/मशि-२, दिनांकित २ एप्रिल, २०१६

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

३५. **अधिसूचना क्रमांक ७७ -** महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर शिक्षक प्रशिक्षण अध्ययनक्रमांना (बी.एड., बी.पी. एड., एम.एड., एम. पी.एड.)द्यावयाच्या प्रवेशाचे विनियमन), नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बी.एड-४६१६/प्र.क्र.१/ मशि-२, दिनांकित ६ मे, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालील सुधारणा सुचविली आहे.**

**उपरोक्त अधिसूचनेतील नियम २ (घ) मध्ये "आवेदनपत्राचा नमूमा" असे शब्द छापले आहेत. त्याऐवजी "आवेदनपत्राचा नमूना" अशी सुधारणा सुचविली आहे.**

उद्योग, ऊर्जा व कामगार (कामगार) विभाग

३६.**अधिसूचना क्रमांक ८० -** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग [मे.सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) च्या ऐरोली, ठाणे येथील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञानावर आधारित सेवा विषयक विशेष आर्थिक क्षेत्राला (आयटी/आयटीइएस एसईझेड) लागू असलेल्या वीज वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी] (पहिली सुधारणा) विनियम,२०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मविनिआ/ तांत्रिक/ परवानाअटी/ माईडस्पेस/ २०१६/ ००४४०/ दिनांकित ६ ऑगस्ट,२०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

आदिवासी विकास विभाग

३७.**अधिसूचना क्रमांक ७८ -** महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एसटीसी- २०१६/प्र.क्र.१०५/का.१०, दिनांकित ३० जून, २०१६.

समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत माहिती ठेवली असता त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

३८. **अधिसूचना क्रमांक ८१ -** महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेली इंग्रजी अधिसूचना सुधारीत करुन त्याप्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेले शुध्दीपत्र शासन अधिसूचना क्रमांक TEM.2016/C.R.482/ TE-4, दिनांकित ९ सप्टेंबर, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

गृह विभाग

३९. **अधिसूचना क्रमांक ८२ -** महाराष्ट्र मद्यार्क आसवन आणि पेय मद्य निर्मिती (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए.१०९१/प्र.क्र.५/राउशु-२, दिनांकित ८ सप्टेंबर, २०१५.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

४०. **अधिसूचना क्रमांक ८३ -** मुंबई मळी (सुधारणा) नियम, २०१५ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक बीपीए. १०९१/प्र.क्र.५/ राउशु-२, दिनांकित ९ सप्टेंबर, २०१५.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

महसूल व वन विभाग

४१. **अधिसूचना क्रमांक ८४ -** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एलक्यूएन-१२/२०१३/प्र.क्र.१९०/अ-२(भाग-१६), दिनांकित २१ एप्रिल, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर खालील शिफारस सुचविली आहे.**

**"भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४' या नियमातील नियम ७ (१) (ख) अन्वये सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाचे मुल्यमापन करण्याकरिता स्थापन करण्यात येणाऱ्या तज्ञ गटामध्ये पंचायती, ग्रामसभा, नगरपालिका किंवा महानगरपालिकेच्या सदस्यांमधून दोन प्रतिनिधी नियुक्त करताना उक्त स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला प्रतिनिधी असतील तर एका महिला प्रतिनिधीस प्राधान्याने प्रतिनिधित्व देण्यात यावे," अशी शिफारस समिती शासनास करीत आहे.**

महसूल व वन विभाग

४२. **अधिसूचना क्रमांक ८५ -** भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) (दुसरी सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक संकीर्ण.११/ २०१४/प्र.क्र.७८/अ-२, दिनांकित १ ऑगस्ट, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

४३. **अधिसूचना क्रमांक ८६ -** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा किंवा कर्मचाऱ्यांच्या नोकरीस महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम २०११ कलम (२) च्या खंड (क) उप खंड (६) मधील तरतुदीनुसार अत्यावश्यक सेवा म्हणून जाहिर केल्याबाबत प्रसिध्द करण्यात आलेली अधिसूचना क्र.आयडीसी-२०१५/प्र.क्र.२६७ (एक)/उद्योग- १४, दिनांकित १८ ऑक्टोबर, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

महसूल व वन विभाग

४४. **अधिसूचना क्रमांक ८७ -** महाराष्ट्र जैविक विविधता (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक डब्लूएलपी.१००४/प्र.क्र.२२६/फ-१, दिनांकित २० ऑक्टोबर, २०१६.

**समितीने उक्त अधिसूचनेवर दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजीच्या बैठकीत विचारविनिमय केला व त्यावर काहीही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.**

# (सहा)
# समितीच्या बैठकींचे कार्यवृत्त

**(सहा)**

**बैठकींचे कार्यवृत्त**

उपविधान समितीची बैठक सोमवार, दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजी सायंकाळी ४.०० वाजता कक्ष क्रमांक २००२ (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

१. श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

२. ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

३. श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

४. श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

५. श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

२. श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

३. श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

उक्त बैठकीत समितीने ग्रामविकास विभागाच्या (अधिसूचना क्र.१७, २०, २१, २२) या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत व अधिसूचना क्रमांक १८ मध्ये समितीने सुधारणा सुचविली. त्याचप्रमाणे बाराव्या विधानसभेचा पहिला अहवाल २०१० व दुसरा अहवाल २०१२ तसेच तेरावी विधानसभा पहिला अहवाल २०१५ व दुसरा अहवाल २०१६ या अहवालांतील शिफारशींच्या अनुषंगाने विभागांकडून प्राप्त झालेली माहिती समितीसमोर ठेवण्यात आली.

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक ५ ऑक्टोबर, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्रमांक २००२ (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री.विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड.संजय धोटे, वि.स.स.

(३) श्री.अमल महाडिक, वि.स.स.

(४) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(५) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.

(६) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

२. श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

३. श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

उक्त बैठकीत गृह (राऊशु) विभाग (अधिसूचना क्रमांक १३, १४, १५, १६ व ४९), गृह (परिवहन) विभाग (अधिसूचना क्रमांक ४५), वित्त विभाग (अधिसूचना क्रमांक ४७, ६१ व ६२), ग्रामविकास विभाग (अधिसूचना क्रमांक ४८ व ५५), सहकार विभाग (अधिसूचना क्रमांक ५१), उद्योग विभाग (अधिसूचना क्रमांक ५७) आणि ऊर्जा विभाग (अधिसूचना क्रमांक ५९ व ६०) या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक २६ ऑक्टोबर, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्रमांक २००२ (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

२. श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

३. श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

उक्त बैठकीत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग (अधिसूचना क्रमांक ६३), वित्त विभाग (अधिसूचना क्रमांक ६४, ६५, ६६, ६८ व ६९), ऊर्जा विभाग (विद्युत नियामक आयोग) (अधिसूचना क्रमांक ६७), उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभाग (अधिसूचना क्रमांक ७०) या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत. तसेच आदिवासी विकास विभागाची अधिसूचना क्रमांक ७८ या अधिसूचनेवर विचारविनिमय करून सदर विभागाच्या विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

उप विधान समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी दुपारी १.०० वाजता कक्ष क्रमांक २००२ (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. विजयराव औटी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(३) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स.

(४) श्री. अमल महाडीक, वि.स.स.

(५) श्री. सुरेश भोळे, वि.स.स.

(६) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(७) श्री. सुभाष ऊर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स.

(८) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(९) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

१. श्री. सुभाषचंद्र मयेकर, विशेष कार्य अधिकारी

२. श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

३. श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :-**

श्री. ल. गो. ढोके, उप सचिव, आदिवासी विकास विभाग.

उक्त बैठकीत समितीने आदिवासी विकास विभागाच्या (अधिसूचना क्रमांक ७८) अधिसूचनेसंदर्भात विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिसूचना क्रमांक ७१, ७२ व ७७ या अधिसूचनांवर सुधारणा सुचविली तसेच अं. ७३, ७४, ७५ व ७६ या अधिसूचनांवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत. उद्योग, ऊर्जा व कामगार (कामगार) विभागाची अधिसूचना क्रमांक ७९ या अधिसूचनेवर आगामी बैठकीत साक्ष घेण्याचा निर्णय घेण्यात आला. उद्योग, ऊर्जा व कामगार (ऊर्जा) विभागाची अधिसूचना क्रमांक ८० या अधिसूचनेवर समितीने विचारविनिमय केला व त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

उपविधान समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता, कक्ष क्रमांक २००२, (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

**उपस्थिती :**

(१) श्री.अतुल भातखळकर, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

(२) ॲड. रामचंद्र अवसरे, वि.स.स.

(३) श्री.अमल महाडीक, वि.स.स.

(४) श्री.तुकाराम काते, वि.स.स.

(५) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

(२) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत अधिसूचना क्रमांक ७९ संदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार (कामगार) विभागाचे प्रधान सचिव हे प्रशिक्षणासाठी विदेश दौऱ्यावर असल्याने विभागीय प्रतिनिधींनी विनंती केल्यानुसार सदरहू साक्ष पुढे ढकलण्यात आली. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाची १ अधिसूचना (अं.८१), गृह (राऊशु) विभागाच्या २ अधिसूचना (अं.८२ व अं.८३,) महसूल व वन विभागाच्या ३ अधिसूचना (अं.८५ व ८७) उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाची १ अधिसूचना (अं.८६) या अधिसूचना विचारात घेण्यात आल्या व त्यावर समितीने कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

तसेच आदिवासी विकास विभागाकडून (अं.७८) अधिसूचनेवर घेण्यात आलेल्या साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केलेली माहिती समितीने विचारात घेतली व त्यावर समितीने कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत व तेराव्या महाराष्ट्र विधानसभेच्या दुसऱ्या अहवालातील महसूल विभागाची अधिसूचना क्र. अं.२ संदर्भात समितीने केलेल्या शिफारशीवरील प्राप्त झालेली माहिती तसेच याच विषयाची नवीन अधिसूचना (अं.८४) ही देखील एकत्रितरित्या समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात आली. त्यावर समितीने सदर माहिती व अधिसूचना एकत्रितरित्या विचारात घेऊन त्यावर शिफारस सुचविली.

उपविधान समितीची बैठक गुरुवार, दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता, कक्ष क्रमांक २००२, (विसावा मजला), विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

**उपस्थिती :**

(१) श्री.विजयराव औटी,वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री.अमल महाडिक, वि.स.स.

(३) श्री.सुरेश भोळे, वि.स.स.

(४) ॲड. संजय धोटे, वि.स.स.

(५) श्री.आनंद ठाकूर, वि.प.स.

(६) श्रीमती हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती पूनम ढगे, अवर सचिव

(२) श्रीमती सीमा तांबे, कक्ष अधिकारी.

सदरहू बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय केला व काही सुधारणा सुचवून तो संमत केला.

**(सात)**

**उपविधान समितीने केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील**

**अनुपालन अहवाल**

**उपविधान समितीचा सन २०१० चा पहिला अहवाल**

**सदरहू अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाहीचे विवरण**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**(१) प्रारूप अधिसूचना क्रमांक डी-८ - महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश), (सुधारणा) नियम, २००८ प्रसिद्ध करणारी प्रारूप अधिसूचना क्रमांक सेप्रनि. २००८/ प्र. क्र. ८२/आस्था-९, दिनांकित १ ऑगस्ट, २००८.**

उपरोक्त प्रारुप अधिसूचना क्रमांक डी-८ या अधिसूचनेवर समितीने सन २०१० च्या पहिल्या अहवालात खालीलप्रमाणे २ शिफारशी केल्या होत्या.

सदर शिफारशीच्या अनुषंगाने कृषि (पदुम) विभागाने त्यावर खालीलप्रमाणे कार्यवाही केल्याबाबतची माहिती दिनांक २६ ऑगस्ट,२०१५ रोजीच्या पत्रान्वये समितीपुढे सादर केली आहे. **(माहिती परिशिष्ट " अ " मध्ये सादर करण्यात येत आहे.) (अनुपालन अहवाल).**

**शिफारस—**

**(१) अधिसूचनेंतर्गत तरतुदींबाबत संबंधित विभागांच्या सचिवांकडून अधिक खुलासा घेतल्यानंतर समितीने शासनास अशी शिफारस केली की, १९९७ सालापासून, आतापर्यंत पदवीकाधारक पशुधन पर्यवेक्षक म्हणून जे काम करतात त्यांना अधिनियमान्वये संरक्षण देण्यासंबंधी विभागाने उचित कार्यवाही करावी. या संदर्भात प्रस्ताव तयार करून तो मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा आणि विधानमंडळाकडे पाठवावा, अशी शिफारस समितीने शासनास केली होती.**

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही –**

पदवीकाधारक पशुधन पर्यवेक्षक म्हणून जे काम करतात त्यांना अधिनियमान्वये संरक्षण देण्यासंबंधी शासन अधिसूचना क्रमांक आयव्हीसी-१००६/प्र.क्र. ५३२/पदुम ४, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये अधिसूचना असाधारण क्र. १०४ निर्गमित करण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

(२) इंडियन व्हेटर्नरी कौन्सिल ॲक्टनुसार पशु सुविधा अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची शिफारस समितीने शासनास केली होती.

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही—**

क्रमांक आयव्हीसी-१००६/प्र.क्र.५३२/पदुम-४, दिनांक २६ ऑगस्ट,२००९ अन्वये अधिसूचनेन्वये (असाधारण क्र. १०४) इंडियन व्हेटर्नरी कौन्सिल ॲक्टनुसार पशु सुविधा अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

उपरोक्त अधिसूचनेसंदर्भात अहवालात केलेल्या शिफारशींची विभागाकडून प्राप्त झालेली माहिती दिनांक २९ ऑगस्ट,२०१६ रोजीच्या बैठकीत समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात आली असून सदर शिफारशींवरील माहिती समितीने विचारात घेऊन त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

# परिशिष्ट "अ"

प्रपत्र

उपविधान समितीच्या पहिल्या अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीचे विवरण

| क्र. | अहवालाचा पृष्ठ क्रमांक व परि.क्रमांक | समितीची शिफारस | शासनाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पृष्ठ क्र. ६ वरील पहिला परिच्छेद | १) अधिसूचनेंतर्गत तरतुदींबाबत संबंधित विभागांच्या सचिवांकडून अधिक खुलासा घेतल्यानंतर समितीने शासनास अशी शिफारस केली आहे की, १९९७ सालापासून, आतापर्यंत पदविकाधारक पशुधन पर्यवेक्षक म्हणून जे काम करतात त्यांना अधिनियमान्वये संरक्षण देण्यासंबंधी विभागाने उचित कार्यवाही करावी. या संदर्भात विभागाने प्रस्ताव तयार करुन तो मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करावा आणि विधानमंडळाकडे पाठवावा अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. | पदविकाधारक पशुधन पर्यवेक्षक म्हणून जे काम करतात त्यांना अधिनियमान्वये संरक्षण देण्यासंबंधी क्रमांक आयव्हीसी-१००६/प्र.क्र.५३२/पदुम ४, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये अधिसूचना असाधारण क्र. १०४ निर्गमित करण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे) |
| | | २) इंडियन व्हेटर्नरी कौन्सिल ॲक्टनुसार पशु सुविधा अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची शिफारस समिती शासनास करीत आहे. | क्रमांक आयव्हीसी-१००६/प्र.क्र.५३२/पदुम ४, दिनांक २७ ऑगस्ट, २००९ अन्वये अधिसूचना असाधारण क्र. १०४ इंडियन व्हेटर्नरी कौन्सिल ॲक्टनुसार पशु सुविधा अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. |

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष ६, अंक ४९]   गुरुवार, ऑगस्ट २७, २००९/भाद्र ५, शके १९३१   [पृष्ठे ७

किंमत : रुपये १८.००

असाधारण क्रमांक १०४

प्राधिकृत प्रकाशन


महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ ऑगस्ट २००९

### अधिसूचना

भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४.

क्रमांक आयव्हीसी. १००६/प्र.क्र. ५३२/पदुम-४ — भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४ (१९८४ चा ५२) याच्या कलम ३०, खंड (ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणाद्वारे तसेच कलम ५७, द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांनुसार; आणि महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात जारी केलेल्या आणि महाराष्ट्र राज्यात लागू असलेल्या आधीच्या सर्व अधिसूचनांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, उक्त परंतुकाखाली विनिर्दिष्ट केलेल्या, कलम ३०, खंड (ख) च्या परंतुकाखालील, पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तींने

करावयाच्या, महाराष्ट्र शासनाच्या आदेशाद्वारे परवानगी दिलेल्या पुढील किरकोळ पशुवैद्यक सेवा, विनिर्दिष्ट करीत आहे :—

(एक) आजारी पशु व पक्ष्यांना प्राथमिक उपचार करणे ;

(दोन) जखमांसारख्या (टाके घातलेले किंवा शस्त्रक्रियाजन्य जखमांसह) वरवरच्या शल्यचिकित्सा आजारांवर तसेच, गळू (abscesses) व्रणनाल (fistula), भाजल्याच्या जखमा, रक्तस्राव यांवर व्रणोपचार करणे ;

(तीन) प्रतिरोधी (antiseptic), (intrauterine) गर्भाशयांतर्गत औषधे देणे ;

(चार) लुगॉल किंवा प्रोव्हिडोन आयोडीन सोल्युशनने पशुंमध्ये पेंटिंग ऑफ सर्व्हिक्स करणे ;

(पाच) प्रोलॅप्स प्रकरणी प्राथमिक उपचार करणे ;

(सहा) वेदना आणि ताप असेल अशा प्रकरणी अॅनालजेसिक व अँटीपायरेटिक्स ही औषधं मुखामार्फत देऊन प्रथमोपचार करणे ;

(सात) टिंपनी, ब्लोट, कॉन्स्टीपेशन, इम्पॅक्शन, डायरिया, डिसेंट्री अशा संसर्गजन्य नसलेल्या आजारांमध्ये प्रथमोपचार करणे ;

(आठ) पशुंच्या शस्त्रक्रिया व त्यांच्यावर उपचार करीत असताना, पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय, लघु सर्व चिकित्सालय आणि पशुवैद्यकीय दवाखान्याचा प्रभार असलेल्या नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीला मदत करणे ;

(नऊ) पशु व पक्ष्यांच्या तापमानाची नोंद घेणे ;

(दहा) एफएमडी, फूट रॉट, ओटायटीस, कंजक्टीव्हायटीस इत्यादी रोग आणि आजारांसाठी आवश्यक त्या प्रतिरोधी औषधी द्रावणाने प्राण्यांचे मुख, खूर, डोळे कान इत्यादी स्वच्छ करणे ;

(अकरा) प्राण्यांमधील साध्या अस्थिभंगाच्या प्रकरणी प्रथमोपचार करा

(बारा) पशुधन आणि कुक्कटपालन गृहांचे निर्जंतकीकरण करणे ;

(तेरा) एक्टोपॅरॉसाईटसच्या नियंत्रणाकरिता संबद्ध औषध देणे किंवा पशुंवर व पक्षांवर फवारणी करणे ;

(चौदा) वेरड वळु, नरमेंढा आणि बोकडांचे closed method द्वारा खच्चीकरण करणे ;

(पंधरा) पशु व पक्ष्यांना विविध रोगांच्या लसी देणे ;

(सोळा) आजारी प्राण्यांसाठी औषधाचे मिश्रण तयार करणे व देणे ;

(सतरा) कृत्रिम रेतन करणे त्याचा पाठपुरावा करणे व त्या संबंधीचे अभिलेख ठेवणे ;

(अठरा) प्रयोगशाळेतील तपासणीसाठी रक्त, रक्तजल, मूत्र, शेण/विष्ठा, वीर्य, दूध आणि इतर घटक (नमुने) गोळा करणे, पाठवणे व त्यावर प्रक्रिया करणे ;

(एकोणीस) औषधिद्रव्य व सौंदर्य प्रसाधन अधिनियम, १९४० (१९४० चा २३) याखाली भारत सरकारने तयार केलेल्या औषधिद्रव्य व सौंदर्य प्रसाधन नियम, १९४५ याच्या " अनुसूची 'एच' ". मध्ये विनिर्दिष्ट केलेली औषधे, नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या औषधपत्रानुसार व त्याने विहित केलेल्या प्रमाणात वापरणे ;

(वीस) विषबाधा, सर्पदंश, इलेक्ट्रोक्युशन, डिस्टोशिया, जंगली श्वापदाने हल्ला करणे, नैसर्गिक आपत्ती, अपघात इत्यादी आपात्कालीन परिस्थितीत प्राथमिक सहाय्य करणे ;

(एकवीस) नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या देखरेखीखाली किंवा निदेशानुसार एक्टो व इंडोपॅरासाइटविरुद्ध ब्लड प्रोटोझुआ, अँथेलमिंटीक्स व जंतुनाशके, अँटीमायक्रोबीयल्स, अँटीफंगल, अँटीबायोटीक्स, हारमोन्स, किमोथेरापेटीक एजंट यांचा वापर करणे ;

(बावीस) संसर्गजन्य रोगांचे संनिरीक्षण, प्रयोगशाळेतील तपासण्या, लसीकरण, गुणनियंत्रण व नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीने नेमून दिलेल्या इतर कोणत्याही तांत्रिक कामात नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीला सहाय्य करणे :

परंतु, वरील सर्व किरकोळ पशुवैद्यक सेवा नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायींच्या देखरेखीखाली आणि निदेशानुसार पार पाडण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश अग्रवाल,
शासनाचे सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya Annexe, Mumbai 400 032, dated 27th August 2009

*NOTIFICATION*

INDIAN VETERINARY COUNCIL ACT, 1984.

No. IVC. 1006/CR 532/ADF 4.—In pursuance of the powers conferred by the *Explanation* to the proviso to clause (*b*) of section 30 read with section 57 of the Indian Veterinary Council Act, 1984 (52 of 1984); and in supersession of all the earlier notifications issued in this behalf by the Government of Maharashtra and in force in the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby specifies the following minor veterinary services to be permitted by the Government of Maharashtra, by Order under the proviso to clause (*b*) of the said section 30, to be rendered by the persons holding a diploma or certificate as specified under the said proviso, for the purposes of the said Act, namely :—

(*i*) to render preliminary aid to ailing animals and birds ;

(*ii*) to carry out dressing of superficial surgical ailments like wounds (including sutured or surgical wounds), abscesses, fistula, burns, haemorrhages ;

(*iii*) to administer antiseptics, intrauterine ;

(*iv*) to carry out painting of cervix in animals with medicaments like Lugol's or Povidone iodine solution ;

(*v*) to render preliminary aid in the prolapse cases ;

(*vi*) to render preliminary aid through oral administration of analgesics and antipyretics in cases of pain and fever ;

(*vii*) to render preliminary aid in non-infectious diseases like tympany, bloat, constipation, impaction, diarrhea, dysentery ;

(*viii*) to assist to Registered Veterinary Practitioner, in charge of Veterinary polyclinic, Mini polyclinic and Veterinary dispensary while performing operations and treatment of animals ;

(*ix*) to record temperature of animals and birds ;

(*x*) to carry out washing of mouth, hooves, eyes, ears of animals with required antiseptic lotions for diseases and ailments like FMD, Foot Rot, Otitis, Conjunctivitis, etc. ;

(*xi*) to render preliminary aid in cases of simple fractures in animals ;

(*xii*) to carry out disinfection of livestock and poultry houses ;

(*xiii*) to carry out application of relevant medicaments or spraying of animals and birds for control of ectoparasites ;

(*xiv*) to carry out castration of scrub bulls, rams and bucks by closed method ;

(*xv*) to vaccinate animals and birds against various diseases ;

(*xvi*) to compound and dispense medicines to ailing animals ;

(*xvii*) to perform Artificial Insemination and carry out follow up and maintain relevant record ;

(*xviii*) to collect blood, serum, urine, fecal samples, semen, milk and other specimens for laboratory examinations ; dispatching and processing of the same ;

(*xix*) to apply or administer the drugs specified in the " Schedule H " of the Drugs and Cosmetics Rules, 1945 made by the Government of India under the Drugs and Cosmetics Act, 1940 (23 of 1940) as per the prescription of the Registered Veterinary Practitioner ; and in the stipulated quantity as prescribed by the Registered Veterinary Practitioner ;

(*xx*) to render preliminary aid in case of emergency like poisoning, snake bite, electrocution, dystocia, wild animal attacks, natural calamities, accidents, etc. ;

(*xxi*) to administer or apply antimicrobials, antifungals, antibiotics, harmones, chemotherapeutic agents against blood protozoa, anthelmintics and insecticides against ecto and endo parasites under the supervision or direction of a Registered Veterinary Practitioner ;

(*xxii*) to assist Registered Veterinary Practitioner in surveillance of infectious diseases, laboratory investigations, vaccine production, quality control and any other technical work assigned by the Registered Veterinary Practitioner:

Provided that, all above minor veterinary services shall be performed under the supervision and directions of the Registered Veterinary Practitioner.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH AGGARWAL,
Secretary to Government.

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ ऑगस्ट २००९.

अधिसूचना

भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४.

क्रमांक आयव्हीसी. १००६/प्र.क्र. ५३२/पदुम-४.—भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम, १९८४ (१९८४ चा ५२) याच्या कलम ३० च्या खंड (ख) च्या परंतुकाद्वारे व कलम ५७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे पशुसंवर्धन संचालनालय किंवा खालील पैकी कोणत्याही एका भारतीय पशुवैद्यकीय संस्थेकडून पशुधन पर्यवेक्षक, स्टॉकमन, स्टॉक असिस्टंट, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (गट ब) बिगर पदवीधर यांची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीस, नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या पर्यवेक्षणाखाली व निर्देशनाखाली किरकोळ पशुवैद्यकीय सेवा देण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे ;

वरील परिच्छेदात नमूद केलेल्या संस्था खालीलप्रमाणे आहेत :—

(१) मुंबई प्रांतात त्यावेळी देण्यात आलेले पशुवैद्यकीय स्टॉकमन प्रशिक्षण अभ्यासक्रम ;

(२) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधानिक कृषि विद्यापीठे यांनी चालविलेला पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम.

(३) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशुवैद्यक व पशुसंवर्धन विज्ञान यामधील दोन वर्षांची सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम आणि ;

(४) महाराष्ट्र तंत्र शिक्षण परीक्षा मंडळ आणि राज्यातील विविध संविधानिक कृषि विद्यापीठे या संस्थांनी पशुवैद्यकीय शास्त्र विषयांसह चालविलेला दुग्धशाळा व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका यामधील दोन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश अग्रवाल,
शासनाचे सचिव.

## उपविधान समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील

## अनुपालन अहवाल

## उपविधान समितीचा सन २०१२ चा दुसरा अहवाल

## सदरहू अहवालात समाविष्ट असलेल्या शिफारशींवर शासनाने केलेल्या कार्यवाहीचे विवरण

## गृह विभाग (राज्य उत्पादन शुल्क)

**(१) अंतिम अधिसूचना क्रमांक ४९ -** महाराष्ट्र शासन, अधिसूचना गृह विभाग क्रमांक एआरएम. १०९६/२१/२/इएक्ससी ३, दिनांकित १३ सप्टेंबर, १९९६ मध्ये आवश्यक बदल करण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर ११०६/सीआर. १६/मायक्रोब्रुव्हरी/इएक्ससी-३, दिनांकित १० ऑगस्ट, २००९.

उपरोक्त अंतिम अधिसूचना क्र. ४९ या अधिसूचनेवर समितीने सन २०१२ च्या दुसऱ्या अहवालात खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

सदर शिफारशीच्या अनुषंगाने गृह (राऊशु) विभागाने त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीपुढे सादर केली आहे. **(माहिती परिशिष्ट " अ " मध्ये सादर करण्यात आली आहे.) (अनुपालन अहवाल)**

**अभिप्राय व शिफारस -**

**" मे बुक्राफ्टस मायक्रो बुईंग प्रा. लि., पुणे, जि. पुणे या घटकाची ब्रुव्हरी व ई-बार एकाच आवारात असून बिअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बिअर उपलब्ध करून देण्यात येते. या बिअरच्या बॉटलिंग व लेबलिंगसाठी विधि व न्याय विभागाने सुचविल्याप्रमाणे, नियमातील सध्याच्या तरतुदी तसेच प्रपत्रे (फॉर्म्स) यामध्ये करावयाच्या सुधारणा " याबाबतची संपूर्ण कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी व त्यासंदर्भातील माहिती त्वरित समितीस कळविण्यात यावी, अशी शिफारस समितीने शासनास केली होती.**

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही :-**

याबाबत अधिसूचना क्र. बीआरएल. ०८११/प्र.क्र. २८९(१)/राऊशु-३ व क्र. बीआरएल. ०८११/प्र.क्र. २८९(२)/राऊशु-३ तसेच क्र. बीआरएल. ०८११/प्र.क्र. २८९(३)/राऊशु-३, दिनांक ८ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. (प्रती सोबत जोडल्या आहेत).

**(२) अंतिम अधिसूचना क्रमांक ५० -** शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक बीपीए. ११२००९/२००९-१०/VIII/दिनांकीत ३१ जानेवारी, २००९ मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेली अंतिम अधिसूचना क्रमांक बीडब्ल्यूआर. ११०६/सीआर-१६ मायक्रोब्रुव्हरी/इएक्ससी-३, दिनांकित १० ऑक्टोबर, २००९

उपरोक्त अधिसूचनेवर समितीने सन २०१२ च्या दुसऱ्या अहवालात खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

**शिफारस –**

**उक्त अधिसूचनेद्वारे "वार्षिक २,००,००० लिटर्सपर्यंत बिअरचे उत्पादन करणाऱ्या मायक्रोब्रुव्हरीकरित रुपये २५,००० इतके अनुज्ञप्ती शुल्क शासनाने निश्चित केले आहे. सदरहू शुल्क रुपये २५,००० ऐवजी रुपये १,००,००० इतके करण्यात यावे."**

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही :—**

याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ३० जानेवारी २०१३ रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. (प्रत सोबत जोडली आहे).

**(३) अंतिम अधिसूचना क्रमांक ६ –** शासन अधिसूचना, गृह विभाग क्रमांक एआरएम. १०९६/२१/२/इएक्ससी-३, दिनांकित १३ सप्टेंबर १९९६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्याबाबत प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना क्रमांक एमआयएस. ०२११/३३३/प्र.क्र. ७६ (१)/इएक्ससी-३, दिनांकित ३० मार्च २०१२.

उपरोक्त अधिसूचनेवर समितीने सन २०१२ च्या दुसऱ्या अहवालात खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

**(अ) जेथे निर्मिती मूल्यावर आधारित उत्पादन शुल्क आकारण्यात येते, तेथे, आयात कर धरून जो खर्च त्या उत्पादनासाठी उत्पादकास करावा लागतो, तो सर्व खर्च निर्मितीमूल्यामध्ये अंतर्भूत करून म्हणजेच आयात करासह निर्मितीमूल्य धरून त्यावर शुल्क निश्चित करण्याबाबतची बाब विभागाने तपासून पहावी व त्यासंदर्भातील अभिप्राय समितीस कळविण्यात यावेत.**

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही :——**

याबाबत विभागाने घटक निर्मिती मुल्या घोषित करताना घटकाकडे होणाऱ्या सर्व खर्चाचा अंतर्भाव उत्पादन खर्चामध्ये करून उत्पादन खर्च घोषित करतो व त्यावर उत्पादन शुल्क आकारण्यात येते. त्यामुळे समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही होत असल्याने वेगळ्याने कार्यवाहीची आवश्यकता दिसत नाही, अशी माहिती दिली आहे.

**(ब) या अधिसूचनेच्या अनुसूचीतील अ.क्र. ४ मध्ये ब्रुव्हरीनिर्मित बिअरसाठी रुपये ४२ प्रति बल्क लिटर ऐवजी मायक्रो ब्रुव्हरीनिर्मित बीअरसाठी रुपये ३३ प्रति बल्क लिटर अशी सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समितीने शासनास केली होती.**

**उपरोक्त शिफारशीवर विभागाने केलेली कार्यवाही :——**

याबाबत विभागने मायक्रोब्रुव्हरी मधील सौम्य बिअर व तीव्र बिअरसाठीचे उत्पादन शुल्क वेगळे अधिसूचित करण्याबाबतची अधिसूचना क्र. एमआयएस. ०२१२/प्र.क्र. ६७/राऊशु-३, दिनांकित २० नोव्हेंबर २०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे).

सदरहू अंतिम ४९, ५० व ६ या अधिसूचनांवरील शिफारशींच्या अनुषंगाने गृह (राउशु) विभागाने कार्यवाही केल्याबाबतची माहिती समितीने दिनांक २९ ऑगस्ट २०१६ रोजीच्या बैठकीत विचारात घेऊन त्यावर कोणतेही अभिप्राय व्यक्त केले नाहीत.

# परिशिष्ट "अ"

क्रमांक : एमआयएस-०२१२/प्र.क्र.६७/राउशु-३
गृह विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२.
दिनांक : २० जून, २०१३.

प्रति,

अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

विषय :- उपविधान समितीचा दुसरा अहवाल.
संदर्भ :- १) आपले पत्र क्र.२००८९/म.वि.स./उपविधान/क्र-२१, दि.२.७.२०१२
२) आपले पत्र क्र.४०३४८/म.वि.स./उपविधान/ड-१९, दि २५.९.२०१२
३) शासन समक्रमांकीत दि.१९.१०.२०१२ चे पत्र
४) आपले पत्र क्र.२२२४७/म.वि.स./उपविधान/ड-२१, दि.१०.५.२०१३

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रे कृपया पहावीत.

संदर्भ क्र.१ येथील आपल्या पत्राच्या अनुषंगाने उपविधान समितीच्या दुसऱ्या अहवालातील समितीच्या शिफारशीवर शासनाने केलेल्या कार्यवाहीची अंतरिम माहिती संदर्भ क्र.३ येथील शासनाच्या दि.१९.१०.२०१२ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

सद्यस्थितीत समितीच्या शिफारशीवरील कार्यवाही पूर्ण झालेली असून उपविधान समितीच्या दुसऱ्या अहवालातील राज्य उत्पादन शुल्क विभागाशी संबंधित शिफारशीवर शासनाने केलेल्या अंतिम कार्यवाहीचे विवरण खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | अहवालाचा पृष्ठ क्रमांक व परिच्छेद क्रमांक | समितीची शिफारस | शासनाने केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ५७ | "मे. वृक्राफ्टस मायक्रो ब्रुइंग प्रा.लि.पुणे, जि.पुणे या घटकाची ब्रुवरी व डेन्बार एकाच आवारात असून बिअरचे विक्रेत्यांमध्ये वितरण न होता थेट ग्राहकास बिअर उपलब्ध करुन देण्यास येते. या बिअरच्या बॉटलिंग व लेबलिंगसाठी विधी व न्याय विभागाने सुचविल्याप्रमाणे, नियमातील सध्याच्या तरतुदी तसेच प्रपत्र (फॉर्म) यामध्ये करावयाच्या सुधारणा याबाबतची संपूर्ण कार्यवाही एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी व त्यासंदर्भातील माहिती त्वरीत समितीस कळविण्यात यावी." अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. | याबाबतच्या अधिसूचना क्र.बीआरएल ०८११/प्र.क्र. २८९(१)/राउशु-३ व क्र.बीआरएल ०८११/प्र.क्र. २८९(२)/राउशु-३ तसेच क्र.बीआरएल ०८११/प्र.क्र. २८९(३)/राउशु-३ दि.८.१०.२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. (प्रती सोबत जोडल्या आहेत) |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | ५८ | "उक्त अधिसूचनेद्वारे वार्षिक २,००,००० लिटरपर्यंत बिअरचे उत्पादन करणा-या मायक्रोब्रुवरीकरिता रु.२५,०००/- इतके अनुज्ञप्ती शुल्क शासनाने निश्चित केले आहे. सदरहू शुल्क रुपये २५,०००/- ऐवजी रु.१,००,०००/- इतके करण्यात यावे." | याबाबत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. ३०-१-१३ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली आहे. (प्रत सोबत जोडली आहे) |
| ३ | ६१ | (१) जेथे निर्मिती मूल्यावर आधारित उत्पादन शुल्क आकारण्यात येते, तेथे आयात कर धरुन जो खर्च त्या उत्पादनासाठी उत्पादकास करावा लागतो, तो सर्व खर्च निर्मितीमुल्यामध्ये अंतर्भूत करुन म्हणजेच आयात करासह निर्मितीमूल्य धरुन त्यावर उत्पादन शुल्क निश्चित करण्याबाबतची बाब विभागाने तपासून पहावी व त्यासंदर्भातील अभिप्राय समितीस कळविण्यात यावेत. | घटक निर्मिती मुल्य घोषित करताना घटकाकडे होणा-या सर्व खर्चाचा अंतर्भाव उत्पादन खर्चामध्ये करुन उत्पादन खर्च घोषित करतो व त्यावर उत्पादन शुल्क आकारण्यात येते. त्यामुळे समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही होत असल्याने वेगळ्याने कार्यवाहीची आवश्यकता दिसत नाही. |
| | | (२) या अधिसूचनेच्या अनुसूचीतील अ.क्र.४ मध्ये "मायक्रो ब्रुवरीनिर्मित बीअर" साठी "रु.४२ प्रति बल्क लिटर" ऐवजी "मायक्रो ब्रुवरीनिर्मित बीअर" साठी "रु.३३ प्रति बल्क लिटर" अशी सुधारणा करण्यात यावी, अशी शिफारस समितीने शासनास केली आहे. | मायक्रोब्रेवरी मधील सौम्य बिअर व तीव्र बिअर साठीचे उत्पादन शुल्क वेगळे अधिसूचित करण्याबाबतची अधिसूचना क्र.एमआयएस ०२१२/प्र.क्र.६७/ राउशु-३ दि.२०.११.२०१२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. (प्रत सोबत जोडली आहे) |

आपला,

( अविनाश म. साबळे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

सोबत :- वरीलप्रमाणे

RNI No. MAHBIL/2009/17???
Reg. No. MH/MR/South-???/2011-13

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ७३] सोमवार, ऑक्टोबर ८, २०१२/आश्विन १६, शके १९३४ [पृष्ठे १०
किंमत : रुपये ९.००

## असाधारण क्रमांक १३८

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ ऑक्टोबर २०१२.

अधिसूचना

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक बीआरएल ०८११/प्र.क २८९ (१)/राऊशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनास महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९९६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम तातडतोब अंमलात आणणे आवश्यक वाटते, म्हणून या सुधारणा महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई पंचवीस) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकान्वयेल तरतुदीनुसार तातडतोब अंमलात आणावेत आणि म्हणून आधी प्रसिद्ध न करता ते करण्यात येत.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई पंचवीस) च्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) मधील खंड (बी), (एफ), खंड एच १ च्या उप खंड पाच व सहा आणि खंड (के) द्वारे

प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे ते असे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती (सुधारणा) नियम, २०१२ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा "प्रधान नियम " असा निर्देश करण्यात आला आहे.) मधील नियम २ मध्ये,

**(अ)** खंड (एकवीस) नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येत आहे, तो असा :—

" खंड (एकवीस-अ) -" मायक्रोब्रुवरी " म्हणजे वार्षिक २,००,००० लीटर क्षमती असलेली अशी ब्रुवरी की त्या अनुज्ञप्तीच्या जागेत बीअर साठविली जाईल, आणि जेव्हा ती मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अंतर्गत मंजूर असलेल्या एफएल-३ किंवा एफएल-४ अनुज्ञप्तीमधुन किंवा विशेष परवाना आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ अंतर्गत मंजूर असलेल्या नमूना - ई अनुज्ञप्तीमधून ५ लीटर पेक्षा कमी नसलेल्या परिमाणातील फक्त पॅकबंद स्वरुपात विक्री करण्यासाठी वितरित करण्यात येईल. "

